साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०६ मे २०२४ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अंबाजोगाईत सभा



अंबाजोगाई, (बातमीदार):- पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी (दि.७) अंबाजोगाईत येणार आहेत.

महायुतीच्या उमेदवार व भाजपच्या जेष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा दुपारी ३ वाजता अंबाजोगाई येथील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथराव मुंडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांच्यासह महायुतीचे नेते, लोकप्रतिनिधी, प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित राहणार आहेत. या सभेची जोरदार तयारी चालू असून या सभेच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ***

## श्री इंदोरीकर महाराज यांचे सोमवारी कीर्तन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील कै. चंद्रकांत उर्फ बाळासाहेब गोविंदराव देशमुख बेलंबकर यांच्या वर्षश्राद्धानिमित्त सोमवारी (दि.६) प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे कीर्तन परळी तालुक्यातील बेलंबा येथे सायंकाळी पाच वाजता होणार आहे. बेलंबा येथील रोकडा शेती येथे हे कीर्तन होणार असून या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री देशमुख बेलंबकर परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे. ***

## ना.मुंडे विविध गावांना भेटी देवून संवाद साधणार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ पालकमंत्री धनंजय मुंडे हे सोमवारी (दि.६) परळी परिसरातील विविध गावांना भेटी देवून ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत. कौडगाव साबळा, कौडगाव घोडा, कौडगाव हुडा, ममदापूर, आचार्य टाकळी, पौळपिंपरी, हिवरा गोवर्धन आदी गावांना भेटी देवून ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ***

# परळी विधानसभा मतदार संघात पुरुष मतदारांच्या तुलनेत स्त्री मतदारांची संख्या १६ हजाराने कमी!

लोकसभा निवडणूक विशेष

परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- गेल्या लोकसभा निवडणुकीनंतर या लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत परळी विधानसभा मतदार संघात मतदारांची संख्या बावीस हजाराने वाढली असून पुरुष मतदारांच्या तुलनेत या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सुमारे सोळा हजाराने कमी आहे.

संपूर्ण परळी तालुका व अंबाजोगाई तालुक्यातील काही गावे मिळून परळी विधानसभा मतदार संघ तयार करण्यात आला आहे. गेल्या म्हणजे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी परळी विधानसभा मतदार संघात ३ लाख चार हजार ३४ एवढी मतदारांची संख्या होती. त्यात आता म्हणजे या लोकसभा निवडणुकीपर्यंत सुमारे २२ हजार ३४० एवढे मतदार वाढले असून एकूण मतदार संख्या ३ लाख २६ हजार ३७४ एवढी आहे. त्यात पुरुष मतदारांची संख्या एक लाख ७१ हजार ९४ एवढी तर स्त्री मतदारांची संख्या एक लाख ५५ हजार २७७ एवढी आहे. पुरुष मतदारांच्या तुलनेत या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सुमारे १५ हजार ८१७ ने कमी आहे.

परळी मतदार संघातील परळी तालुक्यात एकूण २ लाख ३० हजार १३० मतदार असून त्यात पुरूष मतदार एक लाख २० हजार ६३७ एवढे तर एक लाख नऊ हजार ४९० स्त्री मतदार आहेत. पुरुष मतदारांच्या तुलनेत मतदारांची संख्या परळी तालुक्यात ११ हजार १४७ ने कमी आहे.

परळी विधानसभा मतदार संघातील सर्वात मोठे गाव म्हणून ओळख असलेल्या परळी शहरात एकूण मतदार ८० हजार ४४६ एवढे असून त्यात पुरुष मतदार ४१ हजार ९१९ तर स्त्री मतदार ३८ हजार ५२५ एवढे आहेत. पुरूष मतदाराच्या तुलनेत स्त्री मतदारांची संख्या तीन हजार ३९४ ने कमी आहे. परळी मतदार संघात स्त्री, पुरूष मतदार वगळता इतर मतदारांची संख्या तीन आहे.

भाजपच्या जेष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांनी दोन वेळा विधानसभेत तर त्यांच्या धाकट्या बहिण डॉ.प्रितमताई मुंडे यांनीही दोन वेळा लोकसभेत महिला म्हणून या भागाचे प्रतिनिधीत्व केले आहे. आता पंकजाताई बीड मधून लोकसभेसाठी उभ्या आहेत असे असतानाही महिला मतदारांची संख्या येथे कमी आहे, हा चिंतेचा विषय आहे.



### * परळी मतदार संघात ३४२ मतदान केंद्र *

येत्या १३ मे ला होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदार संघात एकूण ३४२ मतदार केंद्र आहेत. त्यात परळी तालुक्यात २४२ परळी शहरात ८२ मतदान केंद्र आहेत. इतर मतदान केंद्र या मतदार संघातील अंबाजोगाई तालुक्यातील ५८ गावात आहेत, त्याची संख्या शंभर आहे.

### * मतदान प्रक्रियेत असणार आडीच हजारावर कर्मचारी *

या लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक मतदान केंद्रावर एकूण चार कर्मचारी नेमण्यात आले आहेत. शिवाय पोलिस, आशा वर्क्सर्स व इतर कर्मचारीही केंद्रावर असणार आहेत. परळी विधानसभा मतदार संघातील ३४२ मतदान केंद्रावर व इतर मिळून सुमारे दोन हजार आठशे कर्मचारी नेमण्यात आले आहेत. ३६ झोन पाडण्यात आले असून मतदान झाल्यानंतर त्याच रात्री मतदान यंत्र एस.टी.बसने बीडला पाठवली जाणार आहेत. मतदान प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे कर्मचारी जिल्ह्याच्या विविध गावातील आहेत. मतदान प्रक्रियेची तयारी तहसील कार्यालयात युद्धपातळीवर सुरू असून यामुळे तहसील कार्यालयाला जत्रेचे स्वरुप आले आहे.

### * चार मतदान केंद्र संवेदनशील *

या निवडणुकीत परळी विधानसभा मतदार संघातील अंबाजोगाई तालुक्यातील धायगुडा पिंपळा येथील तीन व परळी तालुक्यातील वसंतनगर येथील एक असे मिळून चार मतदान केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले असून या केंद्रावर अनुचित प्रकार घडू नये म्हणून अधिक पोलिस बंदोबस्त व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष असणार आहे.

### * दिव्यांग कर्मचारी चालवणार एक मतदान केंद्र *

या लोकसभा निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदार संघातील परळी शहरातील लिट्ल फ्लॉवर शाळेत असणारे १८३ क्रमांकाच्या मतदान केंद्रावर संपूर्ण दिव्यांग कर्मचारी मतदानाची प्रक्रिया पार पाडणार आहेत. आजपर्यंतच्या निवडणुकीत दिव्यांग कर्मचारी असणारे केंद्र हा पहिलाच उपक्रम येथे असणार आहे.

### * पाच मतदान केंद्रावर संपूर्ण महिला कर्मचारी *

या निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदार संघातील परळी शहरातील न्यू हायस्कूल शाळेतील दोन व अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दोन केंद्रात परळी शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेतील एक अशा पाच मतदान केंद्रावर संपूर्ण महिला (सखी) कर्मचारी १३ मे ला मतदानाची प्रक्रिया पार पाडणार आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत असा उपक्रम परळी तालुक्यातील देशमुख टाकळी येथील मतदान केंद्रावर राबवण्यात आला होता.

### * तगडा पोलिस बंदोबस्त *

या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मतदार संघात तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. कर्नाटक येथून सी.ए.पी.एफ. ची ९० पोलिस कर्मचाऱ्यांची तुकडी येथे तैनात करण्यात आली आहे. शिवाय ४५० पोलिस अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तास असणार आहेत.

बीड लोकसभेसाठी एकूण ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात असून येत्या १३ मे ला सायंकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे. या मतदानाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे. नागरिकांनी ओळखपत्र घेवून मतदान केंद्रावर जावून मतदान करावे असे आवाहन उपविभागीय सहाय्यक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

येत्या १३ मे ला होणाऱ्या बीड लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार बी.एल.रुपनर, मतदान विभागातील श्री मुसळे आदी प्रयत्न करीत आहेत. **

# परळीची व्यापार पेठ समृद्ध व अर्थसंपन्न ठेवण्यासाठी शाश्वत विकासाची गॅरंटी देणाऱ्या पंकजाताईला मतदान रुपी आशीर्वाद द्या-ना.धनंजय मुंडे

## ना.धनंजय मुंडेंनी साधला परळीतील व्यापारी बांधवांशी संवाद

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- परळीची व्यापार पेठ ही वर्षानुवर्षे उत्कर्षाकडे वाटचाल करताना दिसते आहे. मागील काही वर्षांमध्ये परळीच्या अवतीभोवती विणले जात असलेले राष्ट्रीय महामार्गाचे जाळे, रेल्वे वाहतूक, त्याचबरोबर नव्याने झालेली एमआयडीसी, तिथे येणारे उद्योग या सर्वांचा उहापोह करता परळीची व्यापार पेठ ही अधिक समृद्ध आणि अर्थसंपन्न होणार असून याकरिता केंद्र व राज्य सरकारची भक्कम साथ आपल्याला लागणार आहे. त्यामुळे व्यापार पेठीची अर्थसंपन्नता वाढवायच्या दृष्टीने शाश्वत विकासाची गॅरंटी देणाऱ्या पंकजाताई च्या पाठीशी सर्व व्यापारी बांधवांनी आपल्या सर्व शक्तीनिशी उभे राहावे व मतदान रुपी आशीर्वाद द्यावेत असे



आवाहन कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी परळी येथे व्यापारी संवाद बैठकीमध्ये बोलताना केले आहे.

परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांच्या पुढाकारातून बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ परळीतील विविध सर्व व्यापारी बांधवांची संयुक्त बैठक कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत धनंजय मुंडे यांनी सर्व व्यापारी बांधवांशी संवाद साधला. परळीची कृषी उत्पन्न बाजार समिती ही मराठवाड्यातील निवडक श्रीमंत बाजार समिती यापैकी एक आहे. तुटीच्या खोऱ्यातील बीड जिल्ह्याच्या हक्काचे ४२ टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी आणल्यानंतर मोठ्या प्रमाणात असलेल्या कोरडवाहू शेतीचे रूपांतर बागायती शेतीत (उर्वरित पान ३ वर)

# बीड जिल्ह्याचा डीडीएस प्लॅन आमच्याकडे तयार !

## ना.धनंजय मुंडेंनी मांडली विकासाची ब्लू प्रिंट

परळी वैजनाथ, (बातमीदार):- पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची वाटचाल विश्वगुरू बनण्याकडे होत आहे. जगात भारत विकासावर स्वार होत असताना बीड जिल्ह्याचा विकासही त्याच पद्धतीने केला जाईल. यासाठी डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट स्टॅटर्जी (डी डी एस )प्लॅन आमच्याकडे तयार असून या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या हक्काचा खासदार संसदेत असणे गरजेचे आहे. यासह विविध मुद्द्यांवर बोलतांना कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी परळीत महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आयोजित संस्थाचालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेळाव्यात बीड जिल्ह्याच्या विकासाची ब्लू प्रिंटच सादर केली.




**बीड जिल्ह्याचे मागासलेपण दूर करणार-** बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा, मागास जिल्हा अशा चुकीच्या पद्धतीने ओळखला जातो. मात्र ही ओळख पुसून कायमस्वरूपी विकसित जिल्हा म्हणून पुढे येण्यासाठी डीडीएस प्लॅन संपूर्णतः कार्यान्वित करणार आहोत. डी.डी.एस.प्लॅन नुसार वरून खाली विकासाचे सूत्र बदलून खालून वर या पद्धतीने विकासाचे सूत्र बीड जिल्ह्यासाठी राबवण्यात येईल. बीड जिल्ह्याच्या सिंचनाचा मोठा प्रश्न असून मोठ्या प्रमाणात असलेली कोरडवाहू व हंगामी जिरायती शेती कायमस्वरूपी सिंचनाखाली आणण्यासाठी पश्चिम वाहिन्या मधून समुद्राला जाणारे पाणी बीड जिल्ह्याला आणण्यात येणार आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात सोयाबीन उत्पादक जिल्हा असलेल्या बीड जिल्ह्यात सोयाबीन प्रक्रिया उद्योग उभारण्यात येणार आहे. कृषी शिक्षणाची दोन महाविद्यालये परळीत लवकरच कार्यान्वित होत आहेत. त्याच बरोबर खाजगी मेडिकल कॉलेजही उभारण्यात येणार आहे.

**येत्या काळात सर्वात विकसित जिल्ह्याच्या स्पर्धेत बीड जिल्हा आणणार-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या या प्रक्रियेत बीड जिल्हा हा अग्रेसर राहणार असून राज्यातील सर्वात विकसित जिल्ह्याशी येणाऱ्या पाच वर्षाच्या काळात बीड जिल्हा स्पर्धा करेल इतकी प्रगती करण्याचा प्रयत्न आमचा राहणार आहे. पंकजाताई मुंडेंची मोदी, शहा व अन्य राष्ट्रीय नेत्यांच्या मांदियाळीत उठबस आहे.त्यामुळे बीडच्या खासदार म्हणून नक्कीच मोठ्या प्रमाणावर विकास केंद्र सरकारमधून त्या निश्चितच खेचून आणतील.

**बीडची लेक-नंबर एक अशा मताधिक्याने ताईंना संसदेत पाठवू-** दरम्यान पंकजाताई मुंडे यांच्यासारखे दिग्गज नेतृत्व आपल्या बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार असून त्यांचा विजय निश्चित तर आहेच मात्र बीड जिल्ह्याची लेख नंबर एक अशा पद्धतीने त्यांचे प्रचंड मताधिक्याने सार्वभौम सभागृहात प्रवेश झाला पाहिजे यासाठी सर्वांनी सर्व शक्तीनिशी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**वैद्यनाथाची कृपा झाली आणि प्रारब्ध बदलले-** गेल्या बारा वर्षांपासून मी आणि पंकजाताई एकमेकांच्या विरोधात काम करत होतो. त्यामुळे सर्वांचीच अडचणही झाली होती. मात्र वैद्यनाथाच्या कृपेने प्रारब्ध बदलले आणि आज आम्ही एकत्र आहोत. एक दिलाने काम करत आहोत. त्यामुळे सर्वांचीच अडचण दूर झाली आहे. आता फक्त जात, धर्म,पंथ हा सर्व भेद संपवून बीड जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात घेऊन जाणे हेच उद्दिष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करुन बीड जिल्ह्याच्या विकासाचे प्रारब्ध बदलण्याची संधी या निमित्ताने आपल्याला मिळणार आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे यांना सर्वोच्च सभागृहात मोठ्या मताधिक्याने आपला प्रतिनिधी म्हणून पाठवणे गरजेचे आहे. ***

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळीत मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीड लोकसभा मतदार संघअंतर्गत परळी विधानसभा मतदारसंघातील ३४२ मतदान केंद्राकरिता नियुक्त झालेले व मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना संपुर्ण मतदान प्रक्रिया याबाबतचे प्रशिक्षण हालगे गार्डन परळी वै येथे तर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत वर्गनिहाय प्रशिक्षण वैद्यनाथ महाविद्यालय परळी या ठिकाणी यशस्वीपणे संपन्न झाले.







यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, व्यंकटेश मुंडे तहसिलदार परळी वै, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर , अण्णा वंजारे यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी , मास्टर ट्रेनर तसेत मंडळ अधिकारी व महसूल विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

बीड लोकसभा मतदार संघ निवडणुक पार्श्वभूमीवर शनिवार दिनांक ०४.०५.२०२४ रोजी सर्व कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न झाले.अधिकारी व कर्मचारी यांची संख्या लक्षात घेता कोणत्याही प्रकारचा विस्कळीतपणा न येता सुलभ पद्धतीने प्रशिक्षण संपन्न व्हावे यासाठी प्रशिक्षण सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात दोन ठिकाणी संपन्न झाले. सकाळच्या सत्रात व दुपार सत्रात १५१६ कर्मचारी यांना हे प्रशिक्षण स्वतंत्रपणे देण्यात आले. या प्रशिक्षणाची सुरुवात ही राष्ट्रगीताने करण्यात आली. माननीय जिल्हाधिकारी दीपा मुधोळ -मुंडे यांचा या प्रशिक्षणास उद्बोधन करणारा शुभेच्छा व मार्गदर्शन करणारा संदेश प्रथम दाखवण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी नियुक्त मतदान अधिकारी यांना ईव्हीम व साहित्य व विविध अहवाल याबाबतीत सविस्तर माहिती देऊन निवडणूकीचे कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच वाचन व पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी व्यंकटेश मुंडे तहसिलदार यांनी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना परळी विधावसभा मतदारसंघात होणारे मतदान साहित्य वितरण केंद्र व स्विकृती केंद्र व त्याचे नियोजन , मतदानाचे आदल्या दिवशी व मतदान दिवशी करावयाची महत्वाची कामे , ईव्हीम मॉक पोल, सिलींग , विविध घोषणापत्र , लिफाफे ईत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक नायब तहसिलदार मिलींद गायकवाड व बालाजी कचरे अवल कारकुन यांचे नियोजनाखाली सर्व झोनल अधिकारी व मास्टर ट्रेनर यांनी वैद्यनाथ महाविद्यालय येथे खोलीनिहाय करण्यात आले. मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक व खुल्या वातावरणात पार पाडण्यात सहाय करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावे असे आवाहन केले. प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट मशीन याचे प्रात्यक्षिक पाहून मतदान यंत्रे स्वतः हाताळनी करून पहिली.या प्रशिक्षणाच्या प्रास्ताविकातून नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांनी निकोप आणि आंनददायी वातावरणात राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन गोपनीयता भंग होणार नाही याची खबरदारी घेण्याचे सांगितले. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सूरज शिंदे, धनराज भाडेकर महसूल सहाय्यक, पंकज दहातोंडे व मुसळे लिपिक नगर परिषद परळी, हरिशचंद्र चाटे व ईतर शिक्षक वसीम शेख, अनिल गवळी, दिगंबर शिनगारे महसूल सहाय्यक तसेच सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, कोतवाल व शिपाई तहसील कार्यालय परळी यांनी परिश्रम घेतले. **

# खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य माहिती पुरवावी-जिल्हाधिकारी

बीड (जिमाका):- खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य माहिती पुरवावी,असे आवाहन जिल्हा दंडाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी खरीप हंगामाच्या आढावा बैठकीत केले. ०१ मे रोजी जिल्हास्तरीय खरीप हंगामा पूर्व आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, विभागीय कृषी सहसंचालक, डॉक्टर मोटे,जिल्हा कृषी अधीक्षक बाबासाहेब जेजुरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, यासह अन्य कृषी विभागातील अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणाचा, अवकाळी पावसाचा, दुष्काळाचा सामना करावा लागतो तरी शेतकरी आशावादी




राहून शेती करतात त्यांना कृषी विभागाच्या विविध खात्याकडून योग्य वेळी योग्य माहिती मिळाल्यास त्यांचा त्रास काही प्रमाणात कमी होईल,असे त्या म्हणाल्या. शासन मान्य असलेल्या आरसीएफ खतांच्या कंपनीकडून खते घेण्यात यावी असे आवाहन त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना केली त्यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांमध्ये जागृती ही करावी असेही ते यावेळी म्हणाल्या. शासनाने नॅनो युरियास प्रोत्साहन दिले असून याचा वापर करण्यासही शेतकऱ्यांना सांगावे. जिल्ह्यात ऊस मोठ्या प्रमाणात होत असून ऊसाला किती हेक्टरी किती पाणी लागते हे निश्चित नसल्याने बऱ्याचदा पाण्याचा अति वापर होतो याबद्दलचा अभ्यास करून हेक्टरी पाणी किती लागते याची माहिती द्यावी असेही त्या यावेळी म्हणाल्या. यासह भविष्यात अधिकाधिक सेंद्रिय खताचा वापर होईल या पद्धतीचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करावे. प्रधानमंत्री केवायसी योजनेअंतर्गत बीड जिल्ह्याची निवड झाली असून बँकांनी शेतकऱ्यांचे ऑनलाइन खाते उघडावे असे न केल्यास बँकांवर गुन्हे दाखल करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. हवामान विभागातील अधिकाऱ्यांनी यावर्षी चांगला पाऊस होणार असल्याची माहिती दिली. त्यानुसार शेतकऱ्यांनी तयारी करावी. ऑगस्ट च्या पुढील महिन्यात अधिक पाऊस होईल अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. केवीके येथील दीप्ती पाडगावकर वैज्ञानिक यांनी शेतकऱ्यांनी मातीचे परीक्षण करावे अशा सूचना केल्या बऱ्याचदा योग्य खतांचा वापर करूनही पीक येत नाही कारण जमिनीची उत्पादकता कमी झालेली असते त्याकडे शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे असेही त्या यावेळी म्हणाल्या. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी पुढील काळात उपयोगी होईल असा चारा ठेवावा. वेळोवेळी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे अशा सूचना डॉक्टर टी एस मोटे, कृषी सहसंचालक मराठवाडा विभाग यांनी दिले. ते म्हणाले या काळात मनरेगा अंतर्गत शेततळ्यांचे काम करण्यात यावे आणि पुढील खरीप हंगाम शेतकऱ्यांना चांगले जाईल अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या. ***

संपादकीय...

# मताचा टक्का वाढला पाहिजे!

–० सुविचार ०–
वागण्यात खोटेपणा असेल तर जगण्यात मोठेपणा असून काय उपयोग?

लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणून लोकसभा निवडणुकीकडे पाहिले जाते. भारतीय लोकशाहीचा स्तंभ भक्कम करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने या उत्सवात सहभागी होऊन मतदान केले पाहिजे. मतदानाचा टक्का वाढावा म्हणून मतदानाच्या कितीतरी दिवस अगोदर पासून निवडणूक आयोग, स्थानिक निवडणूक प्रशासन विविध उपक्रम राबवून जनजागृती करत असते. नागरिकांनी मतदान केंद्रावर जावून मतदान करावे म्हणून गाव, वाडी, वस्तीवर तसेच शहरात विविध चौकात, गल्ली-बोळात, गर्दीच्या ठिकाणी मतदानासाठी जनजागृती करणारे मोठमोठ फलक, बॅनर लावले जातात. शिवाय शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची जनजागृती, फेरी, सायकल रॅली असे उपक्रमही घेतले जातात. त्यास प्रतिसादही चांगला मिळतो. नागरिकांनी मतदान केंद्रावर मतदानाला आले पाहिजे, मतदान केले पाहिजे म्हणून उमेदवार प्रत्यक्ष कार्यकर्त्यांमार्फत मतदाराना भेटून जनजागृती करत असतात. विविध प्रसारमाध्यमांवरही सतत जाहिराती देवून निवडणूक आयोग, संबंधित प्रशासन प्रयत्न करताना दिसते. एकूणच मतदानाचा टक्का वाढावा, अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न केले जातात.

हे असे मोठे प्रयत्न होऊनही मतदानाचा टक्का आपल्याकडे वाढताना दिसत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी दिली जाते. आठवडी बाजार भरवले जात नाहीत. कारखाने, दुकाने व इतर व्यवस्थापनात काम करणाऱ्या कामगार, कर्मचाऱ्यांना पूर्ण तर कुठे अर्धा दिवस सुट्टी दिली जाते. असे होऊनही मतदानाचा टक्का वाढतच नाही असे दिसते. मतदानाची सुट्टी नागरिक 'आनंद' साजरा करण्यासाठी घालवतात तर काही लोकशाही व्यवस्थेवर नाराजी व्यक्त करण्यासाठी, उमेदवारावर रोष व्यक्त करण्यासाठी मतदानाकडे पाठ फिरवतात. त्यामुळे मतदानाचा टक्का घसरताना दिसतो.

गेल्या काही वर्षात आपल्याकडे राजकारणात झालेल्या घडामोडी, वेगवेगळ्या विचाराच्या, पक्षाच्या झालेल्या अभद्र युत्या, सत्तेसाठी एकत्र आलेली वेगवेगळ्या पक्षाची मंडळी या सगळ्या गोष्टीचा सर्वसामान्यांना तिटकारा आला आहे. राजकारणातील झालेला बदल सर्वसामान्यांबरोबरच विविध पक्षीय कार्यकर्त्यांवर मोठा परिणाम करणारा ठरला आहे. यामुळे सर्वसामान्य माणूस राजकारण, राजकारणी, राजकीय पक्षाचे कार्यक्रम याकडे पाठ फिरवताना दिसत आहेत. यामुळेच की काय लोकसभेच्या या निवडणुकीत सुरवातीच्या टप्प्यात मतदानावर परिणाम होवून मतदानाचा टक्का घसरला. त्यातच कडक ऊन, मोठ्या तापमानाचा परिणामही मतदानाचा टक्का घसरण्यावर होताना दिसला. विविध टप्प्यात मतदान कमी झाले म्हणून सर्वांनाच चिंता वाढली आहे. नंतरच्या टप्प्यात मतदानाचा टक्का वाढावा म्हणून प्रशासन विविध उपक्रम, कार्यक्रम राबवत आहेत. प्रशासनाबरोबरच राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्त्यांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनीही मतदानाचा टक्का वाढावा म्हणून प्रयत्न केले पाहिजेत. सर्वसामान्य नागरिकांनीही मतदान प्रक्रियेत भाग घेऊन मतदान केले पाहिजे. भारतीय लोकशाही भक्कम करण्यासाठी मतदानाचा टक्का वाढला पाहिजे याची सर्वांनी जाण ठेवायला हवी.! ***

# कचरा वेचणारे हात शिक्षणाचे धडे कधी गिरवतील?



प्रत्येक शहरात आणि गावाच्या कोपऱ्याला भीक मागून आणि कचरा वेचून जीवन जगणारी मंडळी पाहायला मिळते.कुणीच शिक्षण (एर्वीलरींळेप) घेतलेले नाही. त्यामुळे शिक्षणाचा दूरदूरपर्यंत संबंध नाही. घरातील सदस्यांप्रमाणेच इथली लहान मुलं पण कचरा वेचून आणि भीक मागून आपला उदरनिर्वाह करतात.भीक मागून आणि कचरा वेचून जीवन जगणारी मंडळी पाहायला मिळते. अशावेळी काळीज पिळवटून जाते. इथली लहान लहान मुलंही कधी रस्त्यात, सिग्नलवर भीक मागताना दिसून येतात. त्यांच्या पिढ्यापिढ्या शिक्षणाचा संबंध आलेला नाही नाही, अशाच वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लहान मुलांच्या कुठल्याही प्रकारची कागदपत्र नसल्याने त्यांचा शाळेतही प्रवेश होत नाही. त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणेच ते कचरा वेचायला जाणं आणि शहरभर फिरून भीक मागून जीवन जगणं हा त्यांचा नित्य नियम, मात्र घरात कोणी शिकलेला नसल्यामुळे शिक्षणाचाही महत्व नाही.जे हात कचरा वेचण्यासाठी दिवसभर राबतात, ते हात पाटी पेन्सिलवर शिक्षणाचे धडे कधी गिरवतील?

शहरीकरणामुळे कचरा व्यवस्थापनाची समस्या निर्माण झाली आहे. कचरा व्यवस्थापन ही भारतातील मेट्रो शहरातही एक गंभीर समस्या म्हणून पुढे आली आहे. कचरा वेचक स्थानिक वातावरणाचे आरोग्य राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. ही बालके ६ ते १५ वयोगटातील असतात. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, कौशल्य विकास, आर्थिक क्रिया या क्षेत्रात कचरा वेचणाऱ्या मुलांच्या समस्या आहेत. याकडे लक्ष देण्याची, या क्षेत्राचे नियमन करण्याची गरज निर्माण झाली आहे.समाजातील सर्वांत उपेक्षित हे घटक आहेत. बऱ्याचदा गरीब, अतिपरिचित क्षेत्रातील अनधिकृत झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. कुटुंबाच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करण्यासाठी ही मुले कचरा वेचतात. ते करताना स्वसंरक्षणाचे साहित्य न वापरता त्यांना निवासित परिस्थितीत काम करावे लागते. त्यामुळे त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. सामान्यतः शहरांच्या कचरा व्यवस्थापन यंत्रणेत त्यांना अयोग्य दर्जा मिळतो. या लोकांकडे व्यावसायिक कौशल्य नसते, अशा वेळी ते कचरा वेचणे याकडे उत्पन्नाचा स्रोत म्हणून पाहतात.

हे एक प्रकारचे बालकामगार आहेत. हे आर्थिकदृष्ट्या अप्रिय, मानसिकदृष्ट्या विनाशकारी, शारीरिक, नैतिकदृष्ट्या धोकादायक व हानिकारक आहे. 'युनिसेफ'च्या मते कचरा वेचणे हा बालकामगारांचा सर्वांत वाईट प्रकार आहे. ही मुले शिक्षणापासून वंचित असतात. त्यांच्या आशा-आकांक्षा, स्वप्ने, ध्येय यामुळे मातीमोल ठरतात. शाळा आवडत असूनही यांना शाळेत जाता येत नाही. त्यामुळे त्यांच्या निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. त्यांच्याकडे समाज तिरस्काराने पाहतो. वाईट वागणूक त्यांना दिली जाते. मुलांची हेटाळणी होते. यामुळे मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतो.

व्यसनासारख्या वाईट सवयीमध्ये गुंतलेली दिसतात. अशा मुलांचे मूलभूत तसेच बाल हक्क कायद्याने त्यांना दिलेल्या हक्कांचे सर्रास उल्लंघन केले जाते. त्याचप्रमाणे याची पूर्ण जाणीव असतानाही सरकारकडून त्याला प्रतिबंध करण्यासाठी काहीच उपाययोजना केल्या जात नाहीत. कचरा वेचणाऱ्या मुलांचा तसेच लहान मुलांकडून भीक मागवली जात असल्याच्या मुद्दा जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयासमोर आणण्यात आला. तसेच अशाप्रकारे वाईट स्थितीत जगणाऱ्या वा जगण्यास भाग पाडल्या जाणाऱ्या मुलांच्या तसेच संरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी २०१० मध्ये करण्यात आलेल्या योजनेच्या काटेकोर अंमलबजावणीची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

या मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या हेतुने २०१० मध्ये करण्यात आलेल्या एकात्म बाल संरक्षण योजनेच्या काटेकोर अंमलबजावणीचे आदेश द्यावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या योजनेनुसार, तीन महिन्यात राज्य सरकारने बाल संरक्षण सोसायटी स्थापन करणे, राज्य दत्तक स्रोत संस्था, बाल हक्क आणि बाल हक्क कल्याण समिती प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन करण्याची तरतूद आहे. शिवाय विशेष बाल संरक्षणसाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात एक पथक आणि कल्याणकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे म्हटले आहे.

आपल्या भारतीय राज्यघटनेत भारतीय बालकाला कायद्याने त्याचे मूलभूत हक्क दिलेले असतानासुद्धा आजही अनेक ठिकाणी बालकामगार म्हणून मुलांना राबवून घेतले जात आहेत. कित्येक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. मुले ठिकठिकाणी भीक मागताना आढळतात, कचरा गोळा करताना दिसतात, मानवी व्यापारामध्येही मुलांचा वापर केला जातो. मुलांचे-मुलींचे लैंगिक शोषण केले जाते. ग्रामीण भागात तर कापूस वेचणारी, ऊस तोडणारी, गुरे-मेंढरे हाकणारी, तमाशा कलावंत, कोल्हाटी, डोंबारी इ. प्रसंगी आहेत. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा सुद्धा नाही. आपल्या मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास या विरोधात न्यायालयात कायदेशीर दाद मागता येते. कायद्यानुसार मुलगा २१ वर्षापेक्षा कमी व मुलगी१८ वर्षापेक्षा कमी वयाची असेल, तर त्यांना लग्न करण्याचा अधिकार नाही. झाला तर तो बालविवाह समजून कायद्याने रद्द करता येतो. मुलांच्या बाबतीत सरकार विशेष काळजी घेणे, रस्त्यावर सापडलेली मुले, अनाथ व बेघर मुले, मानसिक व शारीरिकदृष्ट्या आजारी असलेली मुले, घरातून पळून गेलेली मुले, बाल गुन्हेगार इ. मुलांना विविधतेने सरकार काळजी घेऊन त्यांना जगण्याचा हक्क प्रदान करते. राज्यघटनेने बालकांना मूलभूत हक्क जरी दिले तरी बालकांच्या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी सामाजिक संस्थांनी - समजाने विचार करून मुले म्हणजे भावी पिढी देशाचे आधारस्तंभ या विचाराने त्यांच्या संरक्षणासाठी, त्यांचे जीवन सुखी करण्यासाठी पुढे सरसावणे गरजेचे आहे. सरकारी यंत्रणा कार्यान्वित आहेच, परंतु त्यांना साह्य करणे हे प्रत्येक सूज्ञ नागरिकांचे कर्तव्य ठरते.

**– डॉ. सिद्धार्थ तायडे**
परळी वैजनाथ.

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशु प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०७ * अंक ५५ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०६ मे २०२४ * किंमत : २ रू.

# मी जिवंत असेपर्यंत तुम्हाला ऊसाची अडचण येऊ देणार नाही - बजरंगबप्पा सोनवणे

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बप्पांचे आश्वासन; गावोगावी जल्लोषात स्वागत



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. येथील साखर कारखाने बंद पडल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कारखाने बंद पाडलेल्या नेत्यांनी मागील वर्षीचे शेतकऱ्यांचे पैसे दिले नाहीत याचे खरंच आश्चर्य वाटते. यापुढे अशी हेळसांड ऊस उत्पादक शेतकऱ्यांची होणार नाही. मी जिवंत असेपर्यंत गावागावातील प्रत्येक शेतकऱ्याचा ऊस माझ्या कारखान्याला मी घेऊन जाईल, कारखान्याची गाळप क्षमता ही मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे त्यामुळे भविष्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कुठल्याही अडचणीला सामोरे जावे लागणार नाही असे आश्वासन महाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिले. परळी विधानसभा मतदारसंघात बजरंग बप्पा सोनवणे यांनी गाव भेट दौरा केला. या दौऱ्यात आणि गावांना भेटी देऊन त्या ठिकाणी कॉर्नर बैठकाही घेतल्या. या दौऱ्यात त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, सौ.सुदामतीताई गुट्टे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, शेकापचे कालिदास आपेट, कॉ.अजय बुरांडे, शिवसेनेचे भोजराज पालीवाल यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष तथा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शुक्रवारी परळी तालुक्यात गावभेट दौरा केला. मतदार संघातील पिंपरी (बु), गोवर्धन, हिवरा, जळगव्हाण, रामेवाडी, पोहनेर, तेलसमुख, ममदापूर, कौडगाव हुडा, कौडगाव घोडा, साबळे कौडगाव, कानडी, गाढे पिंपळगाव, सेलू, भीलेगाव, वाघाळा, मोहा, करेवडी आदी गावांचा प्रचार दौरा केला. या दौऱ्यात विविध गावांत झालेल्या बैठकांमध्ये त्यांनी विरोधकांवर चांगलाच हल्ला चढवला. ते म्हणाले की, विरोधकांनी विकासाचे राजकारण करावे, जिल्हाच्या उत्कर्षासाठी काय करणार? ते जनतेला सांगावे. मागील अनेक वर्षांपासून त्यांच्या हातात सत्ता आहे. तेच आमदार, तेच खासदार आणि मंत्री आहेत. मात्र असे असूनही जिल्ह्याचा विकास होऊ शकला नाही हे आपले दुर्दैव आहे. म्हणूनच जनता आता कंटाळली असून, परिवर्तनाच्या मानसिकतेत आहे. भाजपाच्या नेत्यांनी आणि आताच्या उमेदवारांनी एवढाच जर विकास केला तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव का झाला? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आजपर्यंत तुमच्या मनावर ऐकलंय, आता माझ्या मनावर एकदा ऐका. परळीच्या नेत्यांना अजिबात तुमची काळजी नाही. ते तुमचं कधीच ऐकणार नाहीत. विरोधकांना माझी विनंती आहे की, सर्वसामान्यांना दापदडप करू नका. कार्यकर्त्यांना धमकी देऊ नका. सर्वांना विनंती आहे मतदानाच्या दिवशी कोणाला घाबरु नका. निर्भयपणे मतदान करा एवढीच विनंती आहे. गावागावात भरभरून स्वागत होत आहे, हे जे आहे ते खरे प्रेम आहे असेही बप्पा म्हणाले.

**गावागावात उत्स्फूर्त स्वागत;**

**बैलगाडीतून मिरवणुका-** महाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी परळी विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांचा प्रचार दौरा केला. या दौऱ्यात गावागावात त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ढोल ताशांच्या गजरात बैलगाडीतून गावभर मिरवणूक काही काढण्यात आल्या यावेळी झालेल्या कॉर्नर बैठका आणि सभांना गावातील महिला पुरुषांसह लहान थोरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ***

# वर्षभरात २५५ बालविवाह थांबविण्यात चाईल्ड हेल्पलाईनला मिळाले यश !!

## जिल्हाधिकारी यांनी केले अभिनंदन

बीड (जिमाका):- वर्षभरात २५५ बालविवाह थांबविण्यात चाईल्ड लाईन हेल्पलाइनला यश मिळाले आहे. याबाबत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी अभिनंदन केले असून त्या म्हणाल्या, हा मैलाचा दगड सर केला आहे, जिल्ह्यात शून्य बालविवाहपर्यंत आणण्याचे आमचे ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

बीड जिल्ह्यात बालविवाह निर्मुलन मोहीम जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या मार्गदर्शनात राबवली जात आहे त्यामुळे हे यश मिळविता आले.

जिल्हयात बाल विवाह होवू नये म्हणून नाविन्यपूर्ण मात्र, आवश्यक त्या उपाय योजना केल्या जात आहेत. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालया अंतर्गत चाईल्ड हेल्पलाईन १०९८ मुळे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान तब्बल २५५ बालविवाह थांबवण्यात, यश आले आहे. मागील वर्ष भरात जिल्ह्यातील आष्टी, परळी, गेवराई या तालुक्यातून बालविवाहाचे प्रकरणे बाहेर आली होती. या प्रकरणांना अंकुश घालण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय व इतर स्वयंसेवी संस्थाच्यामार्फत गाव पातळीवर विविध जनजागृती कार्यक्रम, बालविवाह प्रथा विरोधी प्रतिज्ञा, पथनाट्य, दवंडी अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे बालविवाह विषयक मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. यामुळे गावतील अल्पवयीन मुलींची लग्न होण्याआधी थांबविण्यास मदत झाली आहे.

बालविवाह होत असल्यास किंवा संकटग्रस्त बालकांसबंधी कोणतेही प्रकरण लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड हेल्पलाईन, १०९८ या टोल फ्री, क्रमाकावर माहिती देण्यात यावी. माहिती देण्या-यांचे नांव गोपनीय ठेवण्यात येते. अधिक माहितीसाठी अश्विनी जगताप, जिल्हा समन्वयक चाईल्ड हेल्पलाईन बीड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स पहिला मजला धानोरा रोड बीड (Email-chlbeed2023gmail.com) या ठिकाणी संपर्क करण्यात यावा.

गावात घेण्यात आलेल्या पालक सत्र, चाईल्ड हेल्पलाईन जनजागृती व इतर स्वयंसेवी संस्थाच्या कामांमुळे बालविवाह सारख्या कुप्रथेचे दुष्परिणाम लोकांना समजले. या सर्व एकत्रित प्रयत्नांमुळे प्रशासनाला बालविवाह थांबवण्यासाठी यश आले आहे _श्री मंगेश जाधव (परिविक्षा अधिकारी) सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने धार्मीक स्थळांचे व्यवस्थापक, मंगल कार्यालय मालक/ व्यवस्थापक यांनी वर (मुलगा) व वधू (मुलगी) यांच्या वयाची खात्री शाळा सोडल्याचा दाखला किंवा निर्गम उता-यावरुन करावी.

_ सुधीर ढाकणे, (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बीड)

(पान १ वरुन)......ना.धनंजय मुंडे

होईल त्याचबरोबर वाढते आधुनिकीकरण व अभियांत्रिकीच्या युगात झपाट्याने होत असलेल्या विकासामध्ये परळीची व्यापार पेठ देखील अधिकाधिक समृद्ध होईल असे वातावरण आपल्याला तयार करायचे आहे त्यासाठी संसदेमध्ये पहिल्या ओळीत बसणारा वजनदार खासदार आपला असावा असेही यावेळी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. सर्व व्यापारी बांधवांनी सर्व शक्तीनिशी पंकजाताईंच्या पाठीशी मतदान रुपी आशीर्वाद उभे करावेत असे आवाहन यावेळी धनंजय मुंडे यांनी उपस्थितांना केले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, शकील भाई कुरेशी, राजेश देशमुख, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, ज्ञानोबा माऊली फड, शांतीलाल जैन, विजय वाकेकर, गुलाबराव शेटे, सुनील कोटेचा, सुरेश मुंडे, आत्माराम काळे, कांकरिया शेठ, नाजर भाई, माऊली मुंडे, सुधाकर ढाकणे, सचिन तोतला, दरक शेठ, रघुवीर देशमुख, माणिक कांदे, रामभाऊ चौंडे यांसह आदी उपस्थित होते. ***

# कामगारांच्या कष्टातूनच या संपूर्ण जगाची निर्मिती-रोहिदास जाधव

## सीटूचा परळीत कामगार मेळावा संपन्न




परळी वैजनाथ, (बातमीदार):- कामगारांच्या श्रमातूनच या सुंदर जगाची निर्मिती झालेली आहे. म्हणून कामगारांची मेहनत, कष्ट, जिद्द आणि चिकाटीला सलाम आणि सन्मान करण्याचा दिवस म्हणजे जागतिक कामगार दिन आहे. असे मत एसएफआयचे राज्य सचिव व अर्थशास्त्र विषयाचे संशोधक रोहिदास जाधव यांनी व्यक्त केले.

सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू) कामगार संघटनेच्या वतीने आज दिनांक १ मे रोजी परळीत कामगार मेळावा संपन्न झाला. या मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी रोहिदास जाधव बोलत होते. मेळाव्याची सुरवात सीटूचे ज्येष्ठ नेते प्रा. प्रभाकर नागरगोजे यांच्याहस्ते श्रमिकांच्या लाल झेंड्याचे ध्वज फडकावून करण्यात आली.

जागतिक कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शहरातील आर्य समाज सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सीटूचे नेते किरण सावजी हे होते. सीटूचे जिल्हाध्यक्ष प्रा. बी. जी. खाडे, जिल्हा सचिव डॉ. अशोक थोरात, ज्येष्ठ नेते प्रा. प्रभाकर नागरगोजे, सुवर्णाताई रेवले यांनी सुद्धा मेळाव्यास मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना रोहिदास जाधव म्हणाले की, 'आपल्या देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था कामगार-श्रमिकांच्या कष्टावर आधारलेली आहे. पण कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळत नाही. कामगारांच्या शोषणातून आणि सध्याच्या भाजप सरकारची मेहरबानी आणि मोदींच्या गॅरंटीमुळे अदानी आणि त्यांचे दोस्त मात्र रातोरात मालामाल होताहेत. सध्याचे केंद्रातील धर्मांध भाजप सरकार शेतकरी, कामगारांना दीडदमडीची मदत करत नाही. परंतु बड्या-श्रीमंत उद्योजकांना क्षणार्धात लाखों रुपयांची कर सवलत देतं. भ्रष्टाचारमुक्त देश घडवायची पोकळ भाषा करणाऱ्यांचा भाजप आता संपूर्णपणे 'भ्रष्टाचारी जनता पक्ष' बनला आहे. करोडोचा गैरव्यवहार करणाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश मिळाला की त्यांना क्लीनचीट मिळतेय. शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जात नाही. उलट त्यासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना भाजप आणि त्यांचे प्यादे देशविरोधी ठरवून शेतकरी आंदोलन बदनाम करण्याचा बेगडी प्रयत्न करतात. परंतु हजारो कोटी रुपयांचे कर्ज बुडवणाऱ्यांना भाजप देशाच्या बाहेर पाठवून त्यांना पाठीशी घालत आहे. लोकशाहीला रसातळाला नेऊन भाजपने धर्मांधतेचा नंगा नाच सुरु केला आहे. सत्तेचा माज चढलेल्या भाजपचा खरा चेहरा ओळखून अशा हुकूमशाही प्रवृत्तीच्या मुसक्या आवळणे, आजची खरी गरज आहे. म्हणून सध्याचे भाजप सरकार कुणासाठी काम करतंय, हे कामगारांनी समजून घेतलं पाहिजे. आणि त्यांना त्यांची जागा दाखवली पाहिजे.'

सीटू जिल्हाध्यक्ष प्रा. बी. जी. खाडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'कामगारांनी सजग बनले पाहिजे. खरे काय अन् खोटे काय हे आपल्याला कळलं पाहिजे. आपल्या भाजपकडून खोटा इतिहास सांगितला जातो. इतिहासाला मोडून तोडून मांडण्याचा प्रयत्न होतो. परंतु जे वास्तव आहे, जे खरे आहे, ते आपण सर्वांनी समोर आणले पाहिजे. आज कामगारांच्या समस्यांकडे भाजप सरकार संपूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. म्हणून कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपचा पराभव होणे आवश्यक आहे. म्हणून कामगारविरोधी व धर्मांध भाजपला हरवू शकणाऱ्या महाविकास आघाडीला कामगार संघटनांनी समर्थन दिले आहे. बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना कामगारांनी प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सीटू जिल्हा सचिव डॉ. अशोक थोरात बोलताना म्हणाले की, 'आपली सीटू ही कामगार संघटना देशभरात कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडते. त्यांच्या न्यायाची लढाई लढते. आज जागतिक कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन एकत्र साजरा करताना आपण सीटूचा विस्तार करून तिला मजबूत करण्याचा निर्धार केला पाहिजे. तसेच देशातल्या लोकशाहीला वाचविण्यासाठी भाजपच्या विरोधात, महाविकास आघाडीला मत देऊन निवडून दिले पाहिजे.' सीटू आयोजित या मेळाव्याचे प्रास्ताविक जावेद शेख यांनी केले; जालिंदर गिरी यांनी आभार मानले; तर सूत्रसंचालन प्रकाश वाघमारे यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी, सय्यद सल्लाउद्दीन, अर्जुन सोळंके, शेख मुसा, साईबाबा कांबळे, शेख सलीम, संदेश सरवदे, बाबा दस्तगिर, अजहर शेख, बाबासाहेब रोडे, मुंजा तळेकर, चांद पाशा यांनी अथक परिश्रम घेतले. मेळाव्यास परळी शहर आणि तालुक्यातील कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

'जगातील कामगारांनो एक व्हा', 'जागतिक कामगार दिन जिंदाबाद', 'महाराष्ट्र दिन चिरायू होवो', 'इन्कलाब जिंदाबाद', 'लाल बावटा जिंदाबाद' या घोषणांनी मेळाव्याचा समारोप झाला. ***